CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७० वा फोन २३०१०१ दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ शनिवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# आ.विजयसिंह पंडित यांनी जेवढं झेपेल तेवढंच बोलावं ५ दिवसाला पाणी सोडलं तरी डोक्यावरुन पाणी जाईल

## फोटोसेशन बंद करा आणि बीड शहरातील छोटी छोटी कामे करायला लावा



- कर विभाग खालच्या मजल्यावर आणा
- पालिकेतल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिस्त लावा
- कचऱ्याचे ढीग उचलायला लावा
- बिंदुसरा नदी पात्रात कचरा टाकणे बंद करायला लावा
- प्लॅस्टिकच्या वापरावर पूर्णत: बंदी आणा

### कचरा उचलण्यासाठी ज्या गाड्या आहेत त्याला ट्रॉली जोडा

बीड नगर पालिकेत कचरा उचलण्यासाठी काही नव्या गाड्या आलेल्या आहेत. या गाड्यांचे इंजिन दोन टन वजन वाहून नेण्याच्या क्षमतेचे आहे. त्यामुळे केवळ एवढ्याच गाड्या शहरात फिरवू नका तर त्या गाड्यांना पाठिमागून ट्रॉली जोडा म्हणजे त्यामधून सुद्धा कचरा वाहून नेता येईल. जास्त कचरा उचलला जाईल आणि इंधनाचीही बचत होईल.

### निधी शिवाय होणारी कामे आधी करा

नगर पालिकेकडे निधी नाही, वरुनच पैसा आला नाही अशी कारणं सांगून कामाकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. निधीशिवाय होणारी कामे आधी करायला लावा. शहरात स्वच्छतेसह इतरही अनेक छोटे मोठे प्रश्न आहेत जे केवळ लक्ष घातले तरी मार्गी लागतील. नगर पालिकेमध्ये मनुष्यबळ देखील मोठ्या प्रमाणावर आहे त्याचा योग्य आणि नियमीत वापर केल्यास आहे त्या परिस्थितीत बीड शहर स्वच्छ आणि सुंदर होईल.

**बीड दि.६ (प्रतिनिधी):–** नगर पालिका निवडणुकीच्या निकालानंतर दीड, दोन महिन्यात तेथील एकही पदाधिकारी, अधिकारी काडीवडगाव आणि ईट येथील जल शुद्धीकरण केंद्रावर गेला नाही, मात्र आ.विजयसिंह पंडित स्वत: पुढे आले, फिल्डवर गेले. तिथे जाऊन जल शुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. तांत्रिक बाबींची माहिती घेतली याबद्दल आ.पंडित यांचे अभिनंदन. सध्या बीड शहराला काही भागात १० दिवस तर काही भागात १५ ते २० दिवसाला पाणी पुरवठा होतोय, अशा परिस्थितीत तुम्ही ३ दिवसाआड पाणी देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. परंतु आ.विजयराजेंनी जेवढं झेपल तेवढचं बोलावं. ३ दिवसाआड काय ५ दिवसाला पाणी सोडलं तरी डोक्यावरुन पाणी जाईल. कारण बीड शहरातील पिण्याच्या पाण्याची वितरण यंत्रणा ५ दिवसाला पाणी देण्याइतकी सक्षम नाही. त्यासाठी फार मोठे बदल करावे लागणार आहेत जे इतक्या लवकर होणार नाहीत. गेल्या १० वर्षांपासून २ दिवसाआड आणि ३ दिवसाआड पाणी मिळेल हे ऐकून ऐकून बीडकर कंटाळले आहेत. आता फोटोसेशन बंद करा आणि उगाचच नसत्या घोषणा करु नका. जेवढं शक्य आहे तेच करा आणि तसंच बोला.

### कडक भूमिका घेऊन मेन लाईनवरचे नळ तोडा

बीड शहरातील मेन लाईनवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर नळ कनेक्शन घेतलेले आहेत. यामुळे नियमीत पाणी पुरवठ्याला अडचणी येत आहेत. बेकायदेशीर कनेक्शनमुळे नगर पालिकेचे उत्पन्न देखील बुडत आहे. त्यामुळे आ.विजयसिंह पंडित यांनी नगर पालिका प्रशासनाला कडक भूमिका घ्यायला लावून मेन लाईनवरचे बेकायदेशीर नळ कनेक्शन तोडायला लावावेत. प्रसंगी पोलीस प्रशासनाची मदत घेऊन त्या प्रमाणे कारवाई देखील करायला हवी.

### पाणी वाया जाऊ नये म्हणून नळाला तोट्या बंधनकारक करा

बीड नगर पालिकेकडून पाणी पुरवठ्याचे व्यवस्थीत नियोजन होत नाही, बहुतांश भागात नळाला दोन ते तीन तास पाणी असते. पाणी भरुन झाल्यानंतर नागरिक पाईप लाईन गाड्या धुतात, काही ठिकाणी सिमेंटचे रस्ते सुद्धा धुवून काढतात. बागेमध्ये पाणी सोडून देतात तर काही जण बाथरुममध्ये पाईप टाकून मोकळे होतात. काही जण नळ तसेच रिकामे सोडतात त्यामुळे पाण्याची नासाडी होते. त्यासाठी नगर पालिका प्रशासनाने नळाला तोट्या बंधनकारक करावव्यात. न.प.कर्मचाऱ्यांनी ज्या भागात पाणी सोडण्यात आले आहे तिथे फिरावे. नळ रिकामे दिसल्यास नागरिकांना समज द्यावी. नागरिकांनीही जे लोक गाड्या धुतात, रस्त्यावर पाणी सोडतात त्यांचे फोटो पाठवावेत जेणेकरुन त्यांच्यावर कारवाई करता येईल.

शुक्रवारी आ.विजयसिंह पंडित यांनी नगर पालिकेच्या पाणी पुरवठ्याच्या संदर्भात काडीवडगाव आणि ईट येथील जल शुद्धिकरण केंद्राला भेट देऊन पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता तुषार टेकावडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, उपनगराध्यक्ष तथा पाणी पुरवठा सभापती विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, सभापती शेख निजाम, शेख मुजीब यांची उपस्थिती होती. या पाहणीत योजनेच्या पाईप लाईनवर पाणी गळती, पाणी वितरणातील अवमेळ, फिल्डवरील बिघाड याकडे झालेले दुर्लक्ष आणि तांत्रिक चुका अशा धक्कादायक बाबी समोर आल्या. या सर्वांचा बीड शहराच्या पाणी पुरवठ्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून आले. माजलगावच्या काडीवडगाव येथील बॅक वॉटरवरुन ३६ एमएलटी पाणी प्रत्यक्षात उचलण्यात येत असले तरी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पाणी गळतीमुळे ईटच्या जल शुद्धिकरण केंद्रापर्यंत हे पान २ वर

---

लाथों के भूत बातोंसे नही मानते...!

# न.प. कर्मचाऱ्यास झालेल्या मारहाणीचे नागरिकांकडून समर्थन

- मुजोर व भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सेवा म्हणुन न. प. त काम करावे
- पी.टी.आर. जन्म प्रमाणपत्र मृत्यू प्रमाणपत्रासाठी होऊ नये अडवणूक ही माफक – नागरिकांची रास्त मागणी

**माजलगाव दि.६ ( प्रतिनिधी ):-** माजलगाव नगरपरिषदेत नगराध्यक्षांचे पती यांनी कर्मचा-यास केलेली मारहाण ही कायदेशीर जरी गुन्हा असला तरी मात्र मागील पाच वर्षांच्या प्रशासकीय काळात माजलगाव नगरपरिषदेत अधिका-यांना जी भ्रष्टाचाराची किड लागलेली आहे व कामचुकारे पणाचा जो त्यांनी कळस गाठलेला आहे ते कोणत्याही पदाधिका-याला संतापजनक आहे. माजलगाव नगरपरिषदेमध्ये कोणताच कर्मचारी असो किंवा अधिकारी असो नागरिकांकडुन कायदेशीर व बेकायदेशीर कामाचे पैसे घेतल्याशिवाय कोणतेच काम होत नाही. असे नागरिकात बोलले जात आहे . माजलगाव न.प. मध्ये पैसे खाण्याची लागलेली ही सवय किळसवानी असुन संतापजनक आहे. प्रशासकीय काळात मस्तावलेले हे कर्मचारी व अधिकारी सामान्य माणसाला जेरीस आणत असुन मालकीची पिटीआर मिळण्यापासुन जन्म, मृत्यु, प्रमाणपत्र गुंठेवारी प्रमाणपत्र, बांधकाम परवाना अशी सरळ कामे व्हावीत परंतु काही कर्मचारी यांसारख्या कायदेशीर बाबी विनाकारण त्रासदायक करून जनतेला प्रचंड त्रास देउन पैसा उकळण्याचे मोठे षडयंत्र माजलगाव न. प. मध्ये सुरू आहे. बरबटलेल्या या व्यवस्थेला व प्रशासकीय व्यवस्थेपासुन किड लागलेल्या या व्यवस्थापनाला जर या निवडुण आलेल्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी वेळीच आवर नाही पान २ वर

---


ह.भ.प. तपो निधी..शांती ब्रह्म गुरुवर्य..

# महादेव महाराज चाकरवाडीकर यांना सद्भावना पुरस्कार प्रदान करण्यात येणार



**बीड दि.६ (प्रतिनिधी):–** बीड शहरातील सामाजिक कार्य करणाऱ्या सद्भावना प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय राधेश्यामजी मुंदडा यांच्या स्मृती प्रित्यर्थ यंदाचा सद्भावना पुरस्कार चाकरवाडीचे हरिभक्त परायण महादेव महाराज चाकरवाडीकर यांना आज रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल अन्विताच्या सभागृहात प्रदान करण्यात येणार आहे.

या समारंभास प्रमुख पाहुणे बंकट स्वामी महाराज निनगुर संस्थानचे श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे - गुरुवर्य महंत यांच्या शुभहस्ते आणि छत्रपती संभाजी नगरच्या अप्पर जिल्हाधिकारी सौ.अंजली धानोरकर ज्या की प्रसिद्ध वक्ते आहेत यांच्या विशेष उपस्थितीत देण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यातील सामाजिक धार्मिक कार्य करणाऱ्या महानुभव व्यक्तींना त्यांचे कार्य पान २ वर



सौ.अंजली धानोरकर
अप्पर जिल्हाधिकारी
छत्रपती संभाजी नगर

---

### अर्चना कुलकर्णी यांचे निधन



**बीड दि.६ (प्रतिनिधी):-** शहरातील नवगण कॉलेज रोड परिसरातील गुरुकृपा गृहनिर्माण संस्था येथील रहिवासी डी.सी.सी. बँकेतील सेवानिवृत्त पान २ वर

---

# पो.नि.मुदीराज यांना पोलीस नियंत्रण कक्षात हलविले

**बीड दि.६ (प्रतिनिधी):-** बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि.अशोक मुदीराज यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.



पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी त्यांना थेट पोलीस कंट्रोल रुमला हलविले आहे. अवघ्या तीन महिन्यातच त्यांची बदली करण्यात आल्याने चर्चेला उधाण आले आहे. मुदीराज यांची कार्यपद्धती आणि ग्रामीणची जबाबदारी आल्यापासून त्यांनी घेतलेली भूमिका याला कारणीभूत ठरल्याची चर्चा आहे. पान २ वर

---

एवढी दादागिरी म्हणजे अतिच झालं

# जोपर्यंत माझं बिल निघणार नाही तोपर्यंत गावाला पाणी सोडणार नाही

## असे म्हणणाऱ्या सरपंच पतीचा व्हीडीओ व्हायरल

**बीड दि.६ (प्रतिनिधी):-** जलजीवन मिशनचं काम केलयं, जोपर्यंत केलेल्या कामाचं बिल निघणार नाही तोपर्यंत मी गावाला पाणी सोडणार नाही, अशा शब्दात अंतरवण पिंपरी तांडा (ता.बीड) येथील सरपंच पतीने ग्रामसभेतच दमदाटी



केल्याचा व्हीडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे महिला सरपंच ग्रामसभेला उपस्थित असतांना त्यांच्या शेजारी खुर्ची टाकून अशा पद्धतीने सरपंच पतीच धमकी देत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे. एवढी दादागिरी म्हणजे अतिच झालं म्हणावे लागेल. काम केलेल्या बिलाचा आणि गावच्या पिण्याच्या पाण्याचा इथे संबंध येतो कुठे? पुढची २५ वर्षे त्यांचं बिल निघालं नाही तर तिथल्या लोकांनी काय करायचे? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

या प्रकरणात बाळासाहेब राठोड व इतरांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे व्हीडीओ पुराव्यासह तक्रार केली आहे.

बीड तालुक्यातील अंतरवण पिंपरी तांडा येथील सरपंच पती दिनेश पवार यांनी ग्रामसभेत दिलेल्या पान २ वर

### जि.प. अभियंत्यांनी दिले चौकशीचे आदेश

मौजे अंतरवण पिंपरी तांडा येथील जलजीवन मिशन अंतर्गत सार्वजनिक विहिरीच्या बेकायदेशीर वापराबाबत थेट मंत्र्यांपर्यंत तक्रार करण्यात आली होती. संबंधीत मंत्र्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सूचना देऊन या प्रकरणात कार्यवाही करण्याचे सांगितले होते. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या कार्यकारी अभियंत्यांनी उपअभियंत्यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. प्रत्यक्ष चौकशी करुन नागरिकांना पाणी का उपलब्ध होत नाही? याचा अहवाल देखील तात्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विहिरीचा ताबा तात्काळ ग्रामपंचायतीकडे सोपवून गावचा खंडीत झालेला पाणी पुरवठा तातडीने सुरु करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी आणि या प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी असे आदेश देण्यात आले आहेत.

---

# धांडे नगरमधील मुख्य नाल्याच्या कामाचे मोजमाप आणि मार्किंग झाली, प्रत्यक्ष काम सुरु होणार



**बीड दि.६ (प्रतिनिधी):-** शहरातील बार्शी रोडवरील धांडे नगरमधील मुख्य नाल्याचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षापासून रखडला होता. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊनही त्या वेळच्या मुख्याधिकाऱ्यांनी हा प्रश्न तसाच प्रलंबित ठेवला होता. त्यामुळे पावसाळ्यात हा परिसर जलमय झाला होता. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे झुंजार धांडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पाठपुराव्यामुळे शुक्रवारी नाला कामाचे मोजमाप आणि मार्किंग पूर्ण झाली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

बीड शहरातील धांडे नगरमधील मुख्य नाल्याचे काम रखडल्यामुळे या भागातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यापुर्वी अनेकदा काम करण्याचा प्रयत्न झाला मात्र कुठे ना कुठे कोणीतरी अडवाअडवी करत होते. त्यामुळे हा प्रश्न तसाच प्रलंबित राहिला होता. तब्बल ५ वर्षापासून नाला काम बंद होते. पान २ वर

---

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
**डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे**
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352
महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन बस स्टॅण्डच्या पाठीमागे, बीड.
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्यासमोर
प्रगती होमिओ क्लिनिक, धोंडीपुरा, टिळक रोड, बीड.
खालील आजारांचे निदान व उपचार
- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
  (सतत टेन्शन, घाबरटपणा, घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
  (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
  (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
  (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या
नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो.8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638

छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द व अनुभवी श्वसन विकार तज्ञ डॉक्टर
आता आपल्या माजलगाव आणि गेवराई शहरामध्ये
**डॉ.नितीन चित्ते**
M.B.B.S., DNB Chest Medicine, EDARM (Europe)
तर आजच रुग्णांनी तपासणी व उपचारासाठी संपर्क करावा
स्थळ १ डॉ.ज्ञानेश्वर वि. गिलबिले सरांचे
संजिवनी हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर
राजे छत्रपती संभाजी मार्ग चौक, मंगल नाथ मैदान समोर, बायपास रोड, माजलगाव, जि.बीड
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत
रविवार दि.०८/०२/२०२६ रोजी रुग्ण तपासणीसाठी उपलब्ध माजलगाव-गेवराई
स्थळ २ डॉ.अशोक काळे सरांचे
कुसुम हॉस्पिटल
सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे, गेवराई, जि.बीड.
वेळ : दुपारी २ ते सायं.५ पर्यंत
* संपर्क व नाव नोंदणी *
8956890251 8806444434

**प्लॉट विकणे आहे**
नामलगाव फाटा येथील 1125 Sq.Ft.चा प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
P.P.
:: संपर्क ::
9960701880

CMYK

# पार्श्वभूमी

दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ पान -३


## राफेल आता आणखी घातक

बंगळूरू दि.६ (वृत्तसेवा):- भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातील सर्वात शक्तिशाली लढाऊ विमान असलेल्या राफेलची मारक क्षमता आता अधिक वाढणार आहे. २०२८ सालापासून राफेल विमानांमध्ये भारताची स्वदेशी बनावटीची 'अस्त्र' ही हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे तैनात केली जाणार आहेत. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे संरक्षण क्षेत्रातील भारताची आत्मनिर्भरता सिद्ध होणार असून परदेशी बनावटीच्या महागड्या शस्त्रांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. हवाई दल राफेलमध्ये 'अस्त्र एमके १' आणि 'अस्त्र एमके २' या दोन प्रकारच्या क्षेपणास्त्रांचे एकत्रीकरण करणार आहे.

## देशातील ५० टक्के विमानांमध्ये तांत्रिक बिघाड

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसेवा):- लोकसभेत अधिवेशन सुरू आहे. गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी, भारतीय विमान कंपन्यांशी संबंधित डेटा लोकसभेत सादर करण्यात आला. या डेटामुळे आता विमानाने प्रवास करणा-यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. डेटानुसार, काही महिन्यांपूर्वी भारतीय विमान कंपन्यांच्या विमानांची तांत्रिक तपासणी केली, त्यावेळी त्यापैकी जवळजवळ अर्ध्या विमानांमध्ये वारंवार दोष आढळून आल्याचे समोर आले. यामध्ये एअर इंडिया आणि इंडिगो विमानांचा समावेश आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीगचा दिमाखदार सोहळा संपन्न

केज दि ६ (प्रतिनिधी):- डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीग (एपीएल) चे उद्घाटन बाळराजे आवाडे पाटील यांचे हस्ते गुरुवार, दि.५ फेब्रुवारी रोजी स्व. अजित दादा पवार स्टेडियम (पंचायत समिती केज) येथे उत्साहात संपन्न झाले.

आयपीएलच्या धर्तीवर खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत यंदा १० संघांनी सहभाग नोंदवला असून, केजकरांना पुढील काही दिवस क्रिकेटची मेजवानी मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, युवा नेते राहुल भैय्या गदळे, सरपंच अमोल भैय्या डोईफोडे, व्यंकट हजारे आणि समिर पाशा (पोलीस) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मैदानावर घाम गाळणाऱ्या आणि क्रिकेटमध्ये योगदान देणाऱ्या अकबर इनामदार, प्रकाश मुंडे, बंडू मस्के, शेख जफर, फस्सी मौजन, प्रशांत जाधव, प्रेमजीत हजारे, पाशा शेख आणि इतर खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तर बहुजन विकास मोर्चाचे लखन हजारे व ब्लू स्टार ग्रुप यांच्या वतीने या स्पर्धेचे न नियोजन करण्यात आले आहे. केज शहरातील तरुणांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना खेळाच्या माध्यमातून अभिवादन करावे, या उद्देशाने या लीगचे आयोजन करण्यात आले आहे.

# रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खा.बजरंग सोनवणेंनी केली केंद्रीय रेल्वेमंत्र्यांशी चर्चा



केज दि ६ (प्रतिनिधी) -बीड लोकसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडा विभागातील रखडलेले व अत्यावश्यक रेल्वे प्रकल्प पुर्ण करून घेण्याची मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी यांनी केली. याबाबत त्यांनी संसद भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे, संचार व इलेक्ट्रॉनिक्स मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत मराठवाड्याच्या दळणवळण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय मांडण्यात आले. यावेळी मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या धाराशिव-बीड-

छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाचा मुद्दा बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. मार्च २०२५ मध्ये या प्रकल्पाच्या सर्वेक्षणा साठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रेल्वेमंत्री यांचे आभार व्यक्त करण्यात आले. या प्रकल्पाचा डी पी आर तातडीने पूर्ण करून प्रशासकीय मान्यता देत प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.दरम्यान, घाटनांदूर रेल्वे स्टेशन व परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी काही महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी पुन्हा मांडण्यात आली. यामध्ये औरंगाबाद-गुंटूर, बेंगळुरू-नांदेड, नांदेड -पनवेल या गाड्यांचा समावेश असून, कोविड पूर्वी असलेले थांबे पुन्हापनवेल या गाड्यांचा समावेश असून, कोविंड पूर्वी असलेले थांबे पुन्हा सुरू करावेत, अशीमागणी ही करण्यात आली. यासर्व विषयांवर अश्विनी वैष्णव यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक कार्यवाहीचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले.

## चऱ्हाटा येथे जाऊन केले उबाळे परिवाराचे सांत्वन

बीड दि ६ (प्रतिनिधी) - गेवराई,बीड पंचायत समिती मध्ये ज्येष्ठ विस्तार अधिकारी म्हणून लोकहिताची सेवा देऊन सेवानिवृत्त झालेले बाबुराव नाना उबाळे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. तसे चऱ्हाटा या ठिकाणी जाऊन उबाळे कुटुंबीयांचे उगले यांनी सांत्वन केले. यावेळी समवेत असणारे अखिल भारतीय युवक मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष भागवतराव मस्के, शिवसेनेचे रामभाऊ वायभट यांच्यासह उबाळे कुटुंबातील ज्येष्ठ असणारे मनोहर भाऊ उबाळे, क्रीडा शिक्षक सतीश बाबुराव उबाळे सर, बबनराव उबाळे नेते,नारायण उबाळे सर, गणेश उबाळे हे उपस्थित होते.

## जगभरातील ४० टक्के स्मार्टफोन धोक्यात

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसेवा):- गूगलने जगभरातील अँड्रॉईड युजर्ससाठी धोक्याचा इशारा जारी केला आहे. जगभरातील सुमारे ४० टक्के स्मार्टफोनवर सध्या मालवेअर आणि स्पायवेअरचे मोठे संकट घोंघावत असून, जुन्या ऑपरेटिंग सिस्टीममुळे ही परिस्थिती उद्धवल्याचे गूगलने म्हटले आहे. 'फोर्ब्स'ने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अहवालानुसार, जे स्मार्टफोन अ‍ॅन्ड्राईड १३ किंवा त्यापेक्षा जुन्या ऑपरेटिंग सिस्टीमवर चालतात, त्यांना सर्वाधिक धोका आहे. जुन्या अँड्रॉईड ऑपरेटिंग सिस्टीमला आता सुरक्षा अपडेट्स मिळत नाहीत, ज्यामुळे ते असुरक्षित झाले आहेत.

## प्लॉट खरेदीसाठी १० लाखाची मागणी करून विवाहितेचा छळ ; ७ जणांवर झाला गुन्हा नोंद

केज दि ६ (प्रतिनिधी) -प्लॉट खरेदी साठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी करत सासरच्यांनी शारीरिक व मानसिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी तालुक्यातील नाहोली येथील पती, सासू, सासरे यांच्यासह एकूण सात जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सारूळ येथील पुनम हिचा विवाह नाव्होली येथील जयदत्त बिक्कड यांच्याशी सन २०२२ मध्ये झाला. विवाहानंतर काही काळ सासरकडील मंडळींनी नीट वागणूक दिली. मात्र ३१ ऑक्टोबर २०२२ ते २५२५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पत्नीच्या इच्छेविरुद्ध वारंवार जबरदस्तीने अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच सासरच्या मंडळींनी संगनमत करून फ्लॅट/प्लॉट खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची सतत मागणी केली. यासाठी नाव्होली व पुणे येथे मारहाण, शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. .या प्रकरणी पुनम जयदत्त बिक्कड (वय २६, रा. नाव्होली , मूळ रा. सारूळ) यांच्या तक्रारी वरून पती जयदत्त बाबासाहेब बिक्कड, सासरे बाबासाहेब देविदास बिक्कड, सासू गवळणबाई बाबासाहेब बिक्कड , नणंद दिपाली बाबासाहेब ढाकणे व नंदावे बाबासाहेब विठ्ठल ढाकणे तसेच नणंद ज्योती संतोष तांदळे व नंदावे संतोष रावसाहेब तांदळे अशा सात जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके करीत आहेत.

## बी दि चेंज फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रताप पवार सर सन्मानित

पिंपळवंडी दि.६ (प्रतिनिधी) -पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक प्रताप पवार सर यांना बी दि चेंज फाउंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला असून त्याचे वितरण शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या भक्त निवास संकुलातील सभागृहात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह,मानपत्र,ग्रंथ आणि गौरवपदक देऊन सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार प्रताप पवार सर यांना मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

प्रताप पवार सर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबवलेले इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती,इयत्ता आठवी शिष्यवृत्ती,एन.एम.एम.एस शिष्यवृत्ती परीक्षा यामध्ये माध्यमिक विद्यालयामधून पाटोदा तालुक्यात सर्वाधिक निवड नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम,इंटर ॲक्टिव्ह,डिजिटल बोर्डाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेसाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थी संख्या गळती थांबविण्यासाठी राबविलेली शाळाबाह्य मोहीम या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड झाली. आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष गुरुवर्य ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज ह.भ.प. परमानंद भारती महाराज,सर्व संचालक, उपशिक्षणाधिकारी हजारे, देवकाते, प्राचार्य,शिक्षक-वृंद,आजी-माजी सरपंच,उपसरपंच, चेअरमन, ग्रा.पं. सदस्य,ग्रामस्थ, विद्यार्थी,सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, पत्रकार आदींनी अभिनंदन केले आहे.

## पाटोदा येथील कांकरिया परिवाराच्या कन्येने मिळवला मिसेस आशिया ग्लोबल क्वीन किताब



जामखेड दि ६(प्रतिनिधी) - इंदापूर शहरातील प्रतिष्ठित व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते पियूष संजय बोरा यांच्या सुविद्य पत्नी तसेच इंदापूर शहर भारतीय जैन संघटनेच्या महिला अध्यक्षा आणि पाठवल येथील कांकरिया परिवाराची कन्या सौ. किमया पियूष बोरा यांनी पुणे सिंहगड रोड येथील श्री गणेश गार्डन येथे संपन्न झालेल्या मिसेस एशिया ग्लोबल क्विन २०२६ स्पर्धेमध्ये विजेतेपद संपादन केले.

स्टारफेयर्स इव्हेंट च्या पुढाकाराने तसेच एन एम इंटरप्राइजेस व श्री गणेश गार्डन लॉन्स व बँकवेट च्या सहकार्याने या सौंदर्य गौरव राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन नुकतेच पुणे येथे करण्यात आले होते. यावेळी सिनेअभिनेते कलाकार आफताब शिवदेसानी यांच्या हस्ते तसेच इव्हेंट ऑर्गनायझर पल्लवी मोरे माने व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सौ. किमया बोरा यांना विजेतेपदाचा मुकुट परिधान करण्यात आला. विशेष म्हणजे लग्न झाल्यानंतर १८ वर्षांनी ही स्पर्धा जिंकताना स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वेळेचे बंधन नसते, फक्त पाठपुरावा, मेहनत करणे हे गरजेचे असते हे किमया बोरा यांनी सिद्ध करून दाखवले आहे. सौ. किमया बोरा यांनी सन २०२० मध्ये अतिशय मानाची समजली जाणारी मिस इंडिया युनिव्हर्स क्वारंटाईन क्विन २०२० ही स्पर्धा जिंकून त्यांनी इंदापूर शहराचा गौरव आणि बोरा कुटुंबीयांची शान वाढवली होती. आता २०२६ मध्ये देखील त्यांनी मिसेस एशिया ग्लोबल क्विन २०२६ विजेतेपद जिंकून शहराचा मानसन्मान उंचावला आहे. सौ.किमया बोरा ही बीड जिल्ह्यातील तालुका पाटोदा येथील कांकरिया परिवाराची मुलगी आहे.या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, सुनील चोरडिया, संकेत कांकरिया,नगराध्यक्ष भरत शहा, माजी नगराध्यक्षा सौ. अंकिता शहा, मैत्रीण ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा सौ. अनुराधा गारटकर, उमाताई इंगुले, श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. श्रेणिक शहा, भारतीय जैन संघटनेचे शहराध्यक्ष धरमचंद लोढा, जैन सोशल ग्रुप चे अध्यक्ष नरेंद्र गांधी, सचिव मिलिंद दोशी, युवा क्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत उषा भानुदास शिताप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## कार्यक्रमाला जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीने विद्यार्थी व पालकांचा आनंद झाला द्विगुणित




बीड दि ६ (प्रतिनिधी) -शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अशोकनगर बार्शी नाका येथे वार्षिक स्नेह संमेलन प्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी उपस्थिती दर्शवल्याने विद्यार्थ्यासोबत पालक वर्गांचा आनंद द्विगुणित झाला.

या कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी समंदर खान , शिक्षण विस्तार अधिकारी शिध्देश्वर माटे , तुकाराम जाधव , महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान पवार, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन विजय खोसे, शिक्षक नेते व केंद्रीय मुख्याध्यापक सूनिल कुर्लेकर, केंद्रप्रमुख हाकिम मनियार, श्रीम. कमलताई लांडगे मॅडम, शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष जिवन बागलाने, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष विलास आहेर, सचिन चव्हाण सर, नियाजी सर, जोगदंड सर , शिंदे सर व इतर मान्यवर यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली तर जिल्हाधिकारी यांचा सत्कार अनेकांनी केला. जिल्हाधिकारी सारखा मोठे अधिकारी विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले याबद्दल कुतूहल करून विद्यार्थी व पालकांनी आनंद द्विगुणीत केला.

## छत्रपती शिवरायांचे शौर्य युवकासाठी प्रेरणादायी- शाहीर अनिल तिवारी

पाटोदा दि. ६ (प्रतिनिधी):- छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य युवकासाठी सदैव प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द शाहीर अनिल तिवारी यांनी केले.

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा व १२ वी विद्यार्थ्यांना निरोप समारंभात प्रमुख वक्ते म्हणुन बोलत होते.त्यांनी आपल्या पहाडी आवाजातील पोवाड्यातुन त्यांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

शिवजन्मोत्सव सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणुन शिवाजीराव पंडित महाविद्यालय, गढीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर व्यासपीठावर दुसरे , जेष्ठशिक्षणविस्तारधिकारी मा.बहीर साहेब,प्रा. डॉसुनील जाधव प्रा.सोमनाथ घाडगे सांस्कृतिक विभागाचे प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान व कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व सत्कार मूर्ती भारत कांडेकर यांची उपस्थिती होती.प्रारंभी प्रमुख वक्ते व मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी केले. यानंतर वर्षभरात विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाला. महाविद्यालयातील वरिष्ठ लिपिक . भारत कांडेकर यांचा सेवानिवृत्ती निमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. या नंतर दुसरे वक्ते डॉ.बाळासाहेब पिंगळे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून शिवरांयाचा इतिहास विद्यार्थ्यासमोर मांडला.शेवटी मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम सर यांनी मनोगत केले कार्यक्रमाचे संचलन कु. कार्तिकी जगदाळे व कुमारी मीरा गाडेकर या विद्यार्थिनीने केले तर आभार कु. अस्मिता मुंडे या विद्यार्थिनींनी मानले.

## संजय कोठारी यांच्या प्रयत्नाने रखडलेल्या कामाची झाली सुरुवात



जामखेड दि ६(प्रतिनिधी) - सतत धोकेदायक खडकत पूलाचे काम निखिल कंट्रक्शन करीत असताना हे काम रखडल्याने सतत अपघात घडत होते या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी सतत तक्रारी करत पाठपुरावा चालवला शेवटी त्यांच्या पाठपुराव्याला यश आले. वेळोवेळी केलेल्या तक्रारीमुळे कामास सुरुवात झाली आहे सदर काम मार्च अखेर पूर्ण करून देणार असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्याने दिले आहे जामखेड येथील सर्व गाड्या ह्या खडकत माहीजळगाव मार्गे जातात कारण कडा आष्टी रोडचे काम चालू असल्यामुळे तीन वर्षापासून तो खराब झाला आहे. हा संपूर्ण रोड नगर पर्यंत चांगला झालेला आहे परंतु खडकत पुलाचेच साधारण एक किलोमीटर चे काम राहिले होते बऱ्याच लोकांचे या पुलावरून पडून अपघात झाले आहेत. त्यामध्ये काहींना जीव देखील गमवावा लागला तर काहींना अपंगत्व आले. यामुळे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी निखिल कंट्रक्शनचे इंजिनीयर आणि उपअभियंता अहिल्यानगर यांच्याकडे सतत तक्रारी करत पाठपुरावा चालवला होता. महत्त्वाचे म्हणजे नुकताच एक मोठा अपघात झाला यात दोन जणाला जीव गमवावा लागला . यासंदर्भात कोठारी यांनी सदर कंपनीला जबाबदार धरले होते याची दखल घेऊन आता जोमाने काम चालू झाले असून २० जानेवारीपासून ते मार्च अखेर पर्यंत कंप्लेंट काम करून देतो असे त्यांनी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना सांगितले आहे.

## जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोलीमाळी येथे वार्षिक स्नेहसमेलन उत्साहात संपन्न

चिंचोली माळी दि ६(प्रतिनिधी) -केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळे वार्षिक स्नेह संमेलन मंगळवार दि. ४ फेब्रुवारी रोजी रात्री ६ ते ११ दरम्यान उत्साही वातावरणात व पालक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस गावच्या सरपंच सौ रोहिणी ताई सुनील देशमुख यांच्या हस्ते माता सवित्री आणि जिजाऊच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी देशभक्ती गीते, देवीचे गिते, लावणी, लोक गीते एकापेक्षा एक बहारदार गाण्यावर चिमुकल्यांनी नृत्य सादर केले. याबद्दल पालक वर्ग मधून कुतहल निर्माण झाले होते .तर चिमुकल्यांच्या नृत्यांवर खुश होऊन बक्षिसांचा वर्षाव करत होते. या कार्यक्रमासाठी गावातील जेष्ठ भाजपा नेते सुनिल आबा गलांडे, चेअरमन अरुण काळे, राम मेजर राऊत, माजी सरपंच सुनिल देशमुख, माजी उपसरपंच जितेंद्र देशमुख, पवन पवार, बाळासाहेब गलांडे, ग्राम पंचायत सदस्य अशोक शिंदे, आदीसह गावातील मान्यवरांची आवर्जून उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सुत्र संचालन अमोल राऊत सर व वानखेडे मैडम यांनी केले. कार्यक्रमासाठी परिश्रम घेतल्याचे व सर्व पालक व शिक्षकाचे राम मेजर राऊत यांनी भरभरून कौतुक केले.

## राजस्थानीमध्ये इयत्ता १२ वी चा शुभेच्छा समारंभ संपन्न

बीड दि.६ (प्रतिनिधी):- बीड येथील राजस्थानी सेवा समाज द्वारा संचलित द्वारकादास मंत्री राजस्थानी उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये , इयत्ता १२ वी च्या, विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ संपन्न झाला यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र मुनोत,प्रमुख अतिथी सचिव रामेश्वर कासट,प्राचार्य सुनिल लाहोटी,प्राथमिक मुख्याध्यापक गिरीष सोहनी,उपमुख्याध्यापक अशोक हावळे,पर्यवेक्षक निलेश मालपाणी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकातून प्राचार्य सुनील लाहोटी यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील विविध उपक्रम, अध्ययन अध्यापन व यशाच्या परंपरेविषयी सखोल माहिती दिली तसेच इयत्ता १२ वी तील विद्यार्थी कु.रेणुका शहागडकर,कु.भस्करे अक्षरा,कु.लगड अनुष्का,कु.मोरे अश्विनी,कु.जगताप पूजा,चि.जायभाये अनिकेत,चि.सावंत यश,चि.जाधव शैलेश,कु.ऋतुजा नेमाने,कु.लिंगायत श्रद्धा यांनी आपल्या मनोगतातून अनेक आठवणींना उजाळा दिला यावेळी त्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. सहशिक्षक श्री तौर एस. के. म्हणाले की विद्यार्थी हा विशिष्ट ध्येयाकडे वाटचाल करणारा असावा, स्वतःच्या नावाबरोबर आपल्या कुटुंबाचे, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे , आपल्या देशाचे नाव उंचवावे व आपल्या उन्नतीमध्ये आमचे समाधान असते.मुख्याध्यापक गिरीष सोहनी म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात शिस्त, संस्कार, नैतिक मूल्य, सदवर्तन यांचे नेहमीच जतन करावे, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अतूट नाते असते आणि म्हणून आपल्या हिताविषयी आमच्यामध्ये नितांत तळमळ असते. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र मुनोत म्हणाले की विद्यार्थी हा शिस्तप्रिय असावा, तो कृतज्ञ असावा, संस्काराची जोपासना करणारा असावा, सतत परिश्रमपूर्वक ज्ञान मिळवणारा असावा व त्याच्याकडे संशोधक वृत्ती असावी आणि विकासाच्या वाटेने वाटचाल करणारा असावा अशी भावना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश सावंत यांनी केले तर आभार सौ.अंजली जाधव यांनी मानले यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक शवागार सुरू करावे -मिलिंद सरपते

बीड दि ६(प्रतिनिधी)- जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक शवागार तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे मिलिंद सरपटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हा रुग्णालय हे संपूर्ण जिल्ह्याचे प्रमुख शासकीय आरोग्य केंद्र असून दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्णसेवा दिली जाते. मात्र सध्या असलेली शवागार व्यवस्था अपुरी, कालबाह्य व आधुनिक सुविधांअभावी गैरसोयीची ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मृतदेह सन्मानपूर्वक ठेवण्यासाठी आवश्यक तापमान नियंत्रण, स्वच्छता, पुरेशी साठवण क्षमता तसेच नातेवाईकांसाठी मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून मानवी सन्मान व सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय असल्याचे मिलिंद सरपते यांनी स्पष्ट केले. या निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड,तसेच जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनाही देण्यात आली असून तातडीने ठोस कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.याप्रकरणी जिल्हा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दु:खे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आरोपींना अटक न केल्यास आत्मदहन करण्याचा इशारा

गेवराई दि.६(प्रतिनिधी) - मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देणारे आरोपी अद्यापही फरार आहेत. पोलिसांना ते अजूनपर्यंत सापडत नाहीत. त्यामुळे आमच्या कुटुंबाच्या जिविताला धोका निर्माण झालेला असून मला न्याय द्या अशी मागणी करणाऱ्या फिर्यादीने कुटुंबासह मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देणारे आरोपी अद्यापही फरार आहेत. पोलिसांना ते अजूनपर्यंत सापडत नाहीत. त्यामुळे आमच्या कुटुंबाच्या जिविताला धोका निर्माण झालेला असून मला न्याय द्या अशी मागणी करणाऱ्या फिर्यादीने कुटुंबासह मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.या संदर्भात विजय जगनाथ पोपळपट रा. राक्षसभूवन ता.गेवराई यांनी पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असून सदरील प्रकरण गेवराई येथील दिवाणी न्यायालयात दि.०५ जूलै २०२४ रोजी दाखल झालेले आहे. या गुन्ह्यात अनिल वैजिनाथ पोपळघट, रमेश वेजिनाथ पोपळघट, वैजिनाथ गणपत पोपळघट, सुलोचना वैजिनाथ पोपळघट, गीता रमेश पोपळघट असे एकूण पाच आरोपी आहेत. या आरोपींना अटक वारंट निघालेले आहे. मात्र आतापर्यंत ते एकदाही हजर नाहीत. संबंधित पोलीस कर्मचारी आरोपीला अटक करत नाहीत. उलट उडवाउडवीचे उत्तर देत आहेत. पोलिस टाळाटाळ करत असल्याने मी आणि माझे कुटुंब मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी आत्मदहन करणार आहोत असे विजय जगन्नाथ पोपळघट यांनी म्हटले आहे. आरोपींना अटक न केल्यास आम्हाला दुसरा पर्याय नाही असे निवेदन देण्यात आले असून मला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देणारे आरोपी अद्यापही फरार आहेत. पोलिसांना ते सापडत नाहीत. त्यामुळे, आमच्या कुटुंबाच्या जिवाला धोका निर्माण झालेला असून मला न्याय द्या अशी मागणी फिर्यादी विजय पोपळघट यांनी निवेदनात म्हटले आहे.

# पाटोदा येथील जिल्हा परिषद उर्दु शाळाचे शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार

पाटोदा दि ६ (प्रतिनिधी)महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, बीड यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा दिनांक १ फेब्रुवारी रोजी बीड येथील हॉटेल गोल्डन चॉईस येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी काम करणारे शिक्षक, मुख्याध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना मान्यवरांच्या शुभहस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. याच सोहळ्यात पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा येथील मुख्याध्यापक,कलीम शेखसर,सहशिक्षक अजमत अहेमद बेग तसेच पाटोदा उर्दू शाळा अरबगल्ली शिक्षक इम्रान सर यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कामाची दखल घेत आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.मुख्याध्यापक कलीम शेखसर, अजमत बेग आणि इम्रान सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेले शैक्षणिक प्रयत्न, शिस्तबद्ध प्रशासन, गुणवत्तावाढीसाठी घेतलेली विशेष मेहनत तसेच समाजाभिमुख उपक्रमांमधील सक्रिय सहभाग यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याने शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे. या पुरस्कार सोहळ्यास शहरातील नागरिक, शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षक-कर्मचारी, शिक्षणप्रेमी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, बीडच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पवित्र रमजानपूर्वी शहरातील मज्जिद परिसरात स्वच्छता मोहीम राबवून पथदिवे बसवावे

## नगरसेवक मोमीन मोहसीन पठाण,अफसर खान यांची मागणी



बीड दि ६ (प्रतिनिधी)- मुस्लिम धर्मियांसाठी अत्यंत पवित्र समजला जाणारा रमजान महिना सुरू होत आहे. रमजान महिना सुरू होण्यापूर्वी मुस्लिम बहुल भागात स्वच्छता मोहीम व मस्जिद परिसरात पथदिव्यांची दुरुस्ती करण्यात यावी. या महिन्यात या महिन्यात रात्री मस्जिद मध्ये नमाज पठण करण्यासाठी लोकांची गर्दी असते यामुळे परिसरात असणारे पथदिवे बंद असतील तर ते तात्काळ सुरू करावे व स्वच्छता मोहीम राबवण्याची मागणी नगरसेवक मोमीन मोहसीन पठाण अफसर खान यांनी केली आहे. पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वी शहरातील अल्पसंख्यांक मुस्लिम बहुल भागात स्वच्छता व ज्या भागात मस्जिद आहे त्याजवळ अनेक पोलवर लाईट नाही किंवा असेल तर ती सुरू आहे किंवा नाही याची खात्री जमा करावी. मुस्लिम धार्मिया मध्ये पवित्र समजला जाणारा रमजान महिना येत्या काही दिवसांमध्ये सुरू होत आहे . या महिन्यात लोक उपवास व वेगवेगळ्या धार्मिक कार्य करत असतात त्या अनुषंगाने बीड शहरातील मुस्लिम बहुल भागात स्वच्छता मोहीम व पथदिवे बंद असतील तर ते चालू करणे गरजेचे आहे याकडे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा प्रेम लता पारवे यांनी लक्ष देऊन हे कामे तात्काळ करून घ्यावी अशी मागणी नगरसेवक मोमीन मोहसीन व नगरसेवक पठाण अफसर खान यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे संस्कार समाजात रुजवावेत-प्राचार्य राऊत



बीड दि ६(प्रतिनिधी) :-निरोप समारंभाकडे केवळ एक निरोप म्हणून न पाहता, त्याकडे 'रोप समारंभ' म्हणून पाहावे. इथून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी महाविद्यालयाच्या संस्कारांचे एक रोप आहे, जे समाजाच्या विविध क्षेत्रांत जाऊन या संस्कारांचे रोपण करेल, असे प्रेरणादायी प्रतिपादन तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार दि. ५ रोजी आयोजित निरोप समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.संजय खाडे, डॉ.विकास वाघमारे आणि आयु.माधुरी घुंबरे यांची उपस्थिती होती.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. राऊत पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये साधारणपणे तीन प्रकार आढळतात. काही विद्यार्थी अत्यंत हुशार असतात, काही मध्यम स्तरातील असतात, तर काही विद्यार्थी अभ्यासात मागे राहणारे असतात. मात्र, यश केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नसून मेहनत, सातत्य आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यावर अवलंबून असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण दडलेले असतात. त्या गुणांची ओळख करून त्यावर सातत्याने मेहनत घेतल्यास प्रत्येक विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होऊ शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

# राष्ट्रीय माध्य.व उच्च माध्य.विद्यालयात इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांना निरोप



बीड दि ६(प्रतिनिधी)- शहरातील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.

शहरातील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य श्रीमती तायडे होत्या प्रमुख अतिथी प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील ए.आय. व ज्येष्ठ शिक्षक पाटील पी एन हे उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती देवीच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली प्राचार्य श्रीमती तायडे डी ओ यांचा सत्कार कुमारी दुर्गा मुळे तर पाटील ए.आय.यांचा सत्कार चिरंजीव वाघमारे संदीप आणि पाटील पी एन यांचा सत्कार चिरंजीव शेख मुजाहिद यांनी केला सौ मंत्री एस.ए यांचा सत्कार कुमारी अंजली पोकळे हिने केला. कुमारी सोनाली कानडे हिने आपले मनोगत व्यक्त केले आणि पाटील पी एन व जाधव व्ही पी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अध्यक्षीय समारोप्रसंगी श्रीमती तायडे यांनी केला . कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमारे कानडे सोनाली हिने केले तर आभार प्रदर्शन कुमारी मुळे दुर्गा हिने केले

# ॲड.जोशी परिवाराकडून सोनाली सुतार यांचा गौरव



गेवराई दि.६ (प्रतिनिधी) - गेवराई येथील ॲड.रविंद्र जोशी यांच्या निवासस्थानी ५ फेब्रुवारी रोजी नवनिर्वाचित नगरसेविका सोनाला सुभाष सुतार यांचा ह्रदय सत्कार करण्यात आला.

या कौटुंबिक सोहळयास सौ.संगीताताई रविंद्र जोशी, कु.श्रेया रविंद्र जोशी, ज्येष्ठ पत्रकार सुनिल पोपळे, सुभाष सुतार, सौ.मंगल सुभाष सुतार आदींची उपस्थिती होती. गेवराई नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीत प्रभाग क्रमांक आठच्या, भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार कु.सोनाली सुभाष सुतार यांचा विजय झाला आहे. त्या निमित्ताने ड.रविंद्र जोशी यांनी कौटुंबिक सोहळ्यात सुतार परिवाराचे स्वागत करून, नवनिर्वाचित नगरसेवक कु.सोनाली सुभाष सुतार यांचा सत्कार केला. . गेल्या तीस वर्षापासून सुभाष सुतार आणि सुनील पोपळे यांच्या कुटुंबाचा ड.जोशी परिवाराशी कौटुंबिक जिव्हाळा निर्माण झालेला आहे. ड.जोशी यांच्य परिवाराकडून झालेल्या ह्रदय सत्काराची जाणीव ठेवून, शहराच्या सर्वांगीण विकासात आपण नक्की योगदान देण्याचा प्रयत्न करूत, अशी भावना यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका सोनाली सुभाष सुतार यांनी व्यक्त केली.

# अंबाजोगाई येथे उद्या इंडियन मेडिकल असोसिएशनचा सांस्कृतिक महोत्सव

अंबाजोगाई दि ६ (प्रतिनिधी) - इंडियन मेडिकल असोसिएशनचा सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कलादर्पण महोत्सव यावेळी रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी हॉटेल परिचय हॉल अंबाजोगाई येथे दुपारी २.३० ते ६.३० या वेळेत संपन्न होणार असल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अति ताणतणावामुळे प्रत्येक डॉक्टरच्या आयुष्यामध्ये या कलांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे कारण पैसा हा माणसाची भूक मिटवू शकतो परंतु एखादी कला छंद हा माणसाला आयुष्याला जगण्याचा अर्थ प्राप्त करून देतो असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. कला दर्पण या महोत्सवात गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, नाट्य स्पर्धा रील्स स्पर्धा याचे आयोजन केले जाते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, तेलबिया महामंडळाचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, तहसीलदार विलास तरंगे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी मान्यवर संघटनेचे राज्य सचिव डॉ.विक्रांत देसाई कोषाध्यक्ष अमोल गित्ते उपस्थित राहणार असून अंबाजोगाई स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे सचिव डॉ.उद्धव शिंदे, उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, कोषाध्यक्ष डॉ.बळीराम मुंडे यांच्यासह राज्य कार्यकारिणी समिती सदस्य डॉ.योगेश मुळे, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.सचिन पोतदार, डॉ.इमरान पटेल, डॉ.सचिन चाटे परिश्रम घेत आहेत.

# अंशत:अनुदानित शिक्षकांना सन्मान निवृत्ती योजना सुरु करा-प्रा.इथापे



आष्टी दि ६(प्रतिनिधी)- अंशतः अनुदानित शाळेतून निवृत्त झालेल्या शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांना सन्मानाने जगता येईल अशी वेगळी सन्मान निवृत्ती योजना तयार करून शिक्षकांना न्याय द्यावा, अशा मागणीचे निवेदन राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर यांना देण्यात आले. अशी माहिती शिक्षक चळवळीचे कार्यकर्ते प्रा.अजित इथापे यांनी दिली.राज्यातील काही शाळा अंशतः अनुदानित म्हणजेच २० टक्के पासून ८० टक्के पर्यंत अनुदानाच्या टप्प्यावर आहेत.या शाळा शंभर टक्के अनुदानावर कधी येतील हे आज तरी सांगता येत नाही. या शाळेत कार्यरत असणारे अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त झालेले आहेत. तर अनेक जण निवृत्तीच्या आसपास आलेले आहेत. या शाळा शंभर टक्के अनुदान नसल्याने यांची डी.सी.पी.एस./एन.पी.एस.ची खाती व कपात ही होत नाही. त्यामुळे हे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर यांना निवृत्तीनंतरचे कोणतेही लाभ मिळत नाही. राज्यातील जवळपास ७० हजार शिक्षकांच्या भविष्याचा प्रश्न आहे.अंशतः अनुदानित शाळेतून निवृत्त होणाऱ्या शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांना निवृत्तीनंतरचा कोणताही लाभ उदाहरणार्थ निवृत्ती वेतन (पेन्शन), उपदान (ग्रॅज्युटी), भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) इत्यादी लाभ मिळत नाहीत.त्याबाबतचे निवेदन शिक्षण संचालक यांना दिले, यावेळी प्रमुख उपस्थिती माजी आमदार भगवानआप्पा साळुंखे,संजय लष्करे सर,डॉ.चंद्रकांत बागणे, प्रा.रत्नाकर माळी,भारत शिरगांवकर, प्रा.अजित इथापे,भोपळे सर आदी उपस्थित होते.

# लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष एकनाथ लाड अनंतात विलीन


## शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

गेवराई दि ६ (प्रतिनिधी)- अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन अशा विविध पदावर कार्यरत असलेले गेवराई नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ आप्पा लाड यांच्यावर दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.गेवराई नगर परिषदेमध्ये गेल्या २७ वर्षापासून कार्यरत असलेले पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ लाड यांचे अल्पशा आजाराने दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथे उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत, मनमिळावू आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती असल्याने एकनाथ लाड यांचा तालुक्यातच नव्हे तर जिल्हाभरात मोठा मित्र परिवार आहे. सर्व जाती,धर्मांना



आणि गोरगरिबांना सोबत घेऊन चालत असल्याने आणि पाणीपुरवठा विभागातील आपली जबाबदारी प्रामाणिकपणे निभावत असल्याने गेवराई शहरातील ८० टक्के लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. त्यांच्या पत्नी कविताताई लाड या नुकत्याच नगरपालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. अंत्यसंस्काराच्या वेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, उपनगराध्यक्ष भगवानराव घुम्बार्डे, नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, नगरसेवक महेश सौंदरमल, भाजपा तालुका अध्यक्ष सचिन दाभाडे, शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, गेवराई पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे, अमर लाड, एकनाथ लाड यांच्या पत्नी नगरसेविका कविताताई लाड, मुलगा प्रथमेश लाड, मुलगी प्राजक्ता लाड, यांच्यासह सर्व नगरसेवक, पत्रकार, नगर परिषदचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह गेवराई शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम




गेवराई दि ६(प्रतिनिधी)- संत गजानन महाराज प्रकट दिना निमित्त शहरातील संत गजानन महाराज मंदिरारात विविध धार्मिक कार्यक्रमा बरोबर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ भावीक भक्तांनी घ्यावा असे आवाहन संत गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. विदर्भाची पंढरी असलेल्या शेगांव येथील संत गजानन महाराज यांचा रविवार रोजी ८ फेब्रुवारी रोजी प्रकट दिन असल्याने या निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गेवराई शहरातील संत गजानन महाराज मंदिर,गजानन नगर येथील मंदिरात प्रकट दिना निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन यात सकाळी ८ वाजता अभिषेक,दुपारी १२ वाजता महाआरती व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन या सर्व कार्यक्रमाचा लाभ भावीक,भक्तांनी घ्यावा असे आवाहन गजानन नगर येथील संत गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रकाश आंबेडकर नगर भागात सार्वजनिक शौचालयाची सोय करावी -शहादेव वंजारे

बीड(प्रतिनिधी):- बीड शहरातील बार्शी नाका परिसरात असलेल्या प्रकाश आंबेडकर नगर येथे अनेक वर्षांपासून सार्वजनिक शौचालयांची कोणतीही



व्यवस्था नाही. या परिसरात प्रभाग क्रमांक २६ मधील गोरगरीब व कष्टकरी जनता वास्तव्यास असून, दैनंदिन जीवनात त्यांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.नगरपालिका एकीकडे शहर हागणदारीमुक्त करण्याच्या घोषणा करत असताना, प्रत्यक्षात मात्र अशा वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे महिलांना विशेषतः मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, त्यांची मानहानी होत आहे. सकाळ-संध्याकाळ अत्यंत अडचणीच्या परिस्थितीत प्रवास करावा लागत आहे.शहरातील बार्शी नाका परिसरात असलेल्या प्रकाश आंबेडकर नगर येथे अनेक वर्षांपासून सार्वजनिक शौचालयांची कोणतीही व्यवस्था नाही. या परिसरात प्रभाग क्रमांक २६ मधील गोरगरीब व कष्टकरी जनता वास्तव्यास असून, दैनंदिन जीवनात त्यांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.नगरपालिका एकीकडे शहर हागणदारीमुक्त करण्याच्या घोषणा करत असताना, प्रत्यक्षात मात्र अशा वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे महिलांना विशेषतः मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, त्यांची मानहानी होत आहे. सकाळ-संध्याकाळ अत्यंत अडचणीच्या परिस्थितीत प्रवास करावा लागत आहे.सध्या बार्शी रोड ते इमामपूर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असून आजूबाजूचा भाग जवळजवळ फ्लोटिंग झोनमध्ये आला आहे. अशा परिस्थितीत महिलांचे हाल अधिकच वाढले आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट पाहायला मिळत आहे. वारंवार नगरपालिका प्रशासनाकडे मागणी करून देखील नागरिकांच्या मागनी ची दाखल घेण्यात आली नसून यामुळे या भागातील महिला वर्गांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.तरी संबंधित प्रशासन व नगरपालिकेने या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेऊन प्रकाश आंबेडकर नगर येथे सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था करावी, अशी मागणी शहादेव वंजारे यांनी केली आहे.

# शिक्षणसेवेत प्रामाणिकपणा आणि निष्ठाच खरा वारसा - आ.सुरेश धस




**पाटोदा । महेश बेदरे**

शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ निष्ठेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावणारे शिक्षक व कर्मचारी हे समाज घडविण्याचे खरे शिल्पकार असतात. त्यांच्या सेवेतून घडलेल्या पिढ्याच त्यांच्या कार्याची साक्ष देतात, असे प्रतिपादन आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी केले.

डोंगरकिन्ही (ता. पाटोदा) येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि.६फेब्रुवारी) आयोजित सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी डोंगरकिन्ही केंद्रांतर्गत कार्यरत असलेले श्री. सोंडगे गौतम तुकाराम (केंद्रीय मुख्याध्यापक) तसेच श्री. येवले वैजिनाथ बाबासाहेब (परिचर व माजी सैनिक) यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गौरव करण्यात आला. आमदार धस म्हणाले की, "शिक्षणसेवेत केवळ नोकरी नव्हे तर सामाजिक बांधिलकी असते. श्री. सोंडगे आणि श्री. येवले यांनी आपल्या प्रदीर्घ सेवेतून विद्यार्थ्यांसह शाळा व्यवस्थेवर अमिट ठसा उमटवला आहे. त्यांची कार्यपद्धती पुढील पिढीसाठी आदर्श ठरेल." या समारंभात सेवानिवृत्त मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शिक्षण व शालेय सेवेत त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असून, त्यांच्या कार्यातून अनेक विद्यार्थी घडले, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या पुढील आयुष्यास आरोग्य, समाधान आणि यश लाभो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी गव्हाणे साहेब, श्री. हनुमंत येवले (चेअरमन), श्री. भागवत येवले (तालुका अध्यक्ष, भाजपा), श्री. अनिल काथवटे, श्री. नारायण येवले, श्री. शेषनारायण खरमाटे, श्री. सुदाम येवले, येवले सर, टेकाळे सर यांच्यासह डोंगरकिन्ही, मस्के वस्ती, मुंजार वस्ती व रायतेवाडी येथील शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आत्मीय वातावरणात पार पडला असून, सेवापूर्ती गौरव सोहळ्यामुळे शाळा परिसरात सन्मान आणि कृतज्ञतेची भावना अनुभवायला मिळाली.

# आहेर धानोरा येथील भव्य भागवत कथेस गणेश उगले यांची सपत्नीक भेट

बीड दि ६ (प्रतिनिधी) : बीड शहरापासून जवळ असलेल्या व लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील चराटा पंचायत समिती गणातील आहेर धानोरा या गावातील महिला मंडळींनी पुढाकार घेत गावात प्रथमच या भागातील वरवटी येथील हरिभक्ती परायण कृष्ण भक्त कृष्ण सखी कुमारी अंजनाताई कोटुळे वृंदावन धाम यांची भागवत कथा आयोजित केली आहे. या भागवत कथेच्या सहाव्या दिवशी गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारी रोजी शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक गणेश उगले व त्यांच्या पत्नी सौ. अश्विनीताई गणेशराव उगले यांनी भेट कथा श्रवण केली.

सर्वप्रथम भागवत कथेच्या संयोजन समितीच्या वतीने त्यांचा समस्त ग्रामस्थ व उपस्थित माता-भगिनींच्या वतीने सत्कार करण्यात आला. सौ.अश्विनीताई उगले यांचा सौ. कोमलताई इंगोले व सौ शितलताई इंगोले यांनी भागवत कथा संयोजन समितीच्या वतीने सत्कार केला. यावेळी भागवत कथाकार कुमारी अंजनाताई कोटुळे यांचे व सौ. उगले यांनी दर्शन घेत आशीर्वाद घेतले. यावेळी गावच्या सरपंच सौ. मोनाली ताई बालासाहेब इंगोले, उद्योजक श्री विनोद आप्पा इंगोले, अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले, उद्योजक बालासाहेब इंगोले, शिवसेनेचे दत्ता वळे, नितीन नाना दिवे, सूत्रसंचालक प्रकाश फाटक, सुशील दिवे, चेअरमन गोरखराव इंगोले, बबनराव इंगोले, कालिदास मेंगडे, योगेश इंगोले, औदुंबर दिवे, आकाश इंगोले, आकाश कदम यांच्यासह आहेर धानोरा व परिसरातील असंख्य महिला माता भगिनी व लाडक्या बहिणी यांच्यासह गावातील भक्तमंडळी उपस्थित होती.

## विज्ञानासोबत जीवन जगत असताना, अध्यात्माची जोड आवश्यक आहे - महेश महाराज खामगावकर



माजलगाव (प्रतिनिधी)- माजलगाव येथे संत श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त सुरु असलेल्या श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्या मध्ये पाचव्या दिवसाची कथा गुंफताना वे. मु. महेश महाराज खामगावकर यांनी सांगितले कि, आजच्या या धकाधकीच्या जीवनात आपण सर्व व्यस्त आहोत आणि त्यामध्ये आपल्याला जीवन जगत असताना विज्ञानाचा खूप मोठा आधार घ्यावा लागतो, या युगात जरी आपण विज्ञानाशिवाय जगू शकत नसलो तरी आत्मिक समाधानासाठी व शांततेसाठी मनुष्याला अध्यात्माची खरोखर गरज आहे, करण विज्ञान आपल्याला भौतिक सुख देते परंतु अध्यात्म आपल्यला जीवनात शांती आणि संकटावर मात करण्यासाठी बळ प्रदान करते.या कथेला संगीत साथ हभप अभिषेक म टाले व हभप भरत म सुरवसे यांची असून, गवारे ताई, व शिवहर गायगवे हे करीत आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी या सोहळ्याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन लक्ष्मण भाऊ लाहोटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सीमा आनंदगावकर, सुरवसे ताई, मोताळे सर व इतर सर्व भाविक परिश्रम घेत आहेत.

## माजलगाव शहरला परत राहुल सुर्यतळ यांची बदली झाल्याबद्दल जनसामान्यांत उत्साहाचे वातावरण

माजलगाव (प्रतिनिधी) : माजलगाव शहर पोलिस स्टेशन ला परत पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांची बदली झाल्या बद्दल सर्व सामान्य नागरीकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहवयास मिळत असुन सर्व सामान्य मानसात मिळून मिसळून राहणारे सुर्यतळ यांची काही दिवसांपूर्वी बीड येथे बदली झाली होती परंतु जनसामान्य लोकांची मागणी मान्य होऊन परत माजलगाव शहर ला बदली झाली राहुल सुर्यतळ हे अत्यंत प्रमाणिक मनमिळाऊ शिस्तबद्ध पो नि असुन सर्व सामान्य लोकांचे काही अडीअडचणी असेल तर स्वतः लक्ष घालून प्रमाणिक पणे सोडवण्याचा नेहमी च प्रयत्न करतात म्हणून त्यांचे बदल जनमानसात आदराचे स्थान आहे विशेष म्हणजे त्यांना किती हि महत्वाचे काम असेल तरी एखाद्या सर्व सामान्य कुटूंबातील विवाह कार्य असो की छोटा कार्यक्रम असो आणि त्या व्यक्तीने निमंत्रण दिले तर आवर्जून उपस्थित राहून सदिच्छा भेट देणारे अधिकारी म्हणून सुर्यतळ यांची ओळख असल्या चे मत बी. जी. कुलथे आणि आर्यन कुलथे यांनी व्यक्त केले माजलगाव शहर ला असे अधिकारी खुप वर्षां नी मिळाले असल्याचे जनसामान्य मानसात उत्साह चे आणि समाधानाचे वातावरण दिसत असल्याचे मत हि बी जी कुलथे मुन्नाभाई राठोड कृष्णा डहाळे संजय कारळकर साळवे जितेंद्र कुलथे तुळशिराम गडदे सुखदेव शिंदे विवेक उंडे इरफान आदींनी व्यक्त केले आहे.

## सवसवाडीत श्री ओंकारेश्वर शिवमंदिरात मुर्तीची महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना

### मंदिर विकासासाठी आ.सुरेश धस यांचा निधी जाहीर

बीड दि.६ (प्रतिनिधी): शिरूर कासार तालुक्यातील सवसवाडी येथे ग्रामस्थांच्या अपार श्रद्धा आणि कष्टातून साकारलेल्या भव्य श्री ओंकारेश्वर शिवमंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा शुक्रवारी भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या पवित्र सोहळ्यासाठी महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांची वंदनीय उपस्थिती लाभली, तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आ.सुरेश आण्णा धस उपस्थित होते.

शुक्रवारी शास्त्रोक्त पद्धतीने आणि मंत्रोच्चारात मंदिरात महादेव पिंड व नंदी मूर्तीची स्थापना करण्यात आली.मंदिरावर उभारलेला ५१ फूट उंचीचा भगवा धर्मध्वज परिसराचे मुख्य आकर्षण ठरला आहे. मंदिर उंचावर असल्याने हा ध्वज जाटनांदूर परिसरातील अनेक गावांमधून दृष्टीस पडत आहे. तसेच महादेवाचे ओंकारेश्वर रूप या भागात दुर्मिळ असल्याने, हे मंदिर आता पंचक्रोशीतील भाविकांसाठी कुतूहलाचा आणि श्रद्धेचा विषय बनले आहे.या सोहळ्यासाठी सवसवाडी ग्रामस्थांनी एकत्र येत लोकवर्गणीतून मंदिराची उभारणी केली आहे.



### आ.सुरेशअण्णा धस यांची उपस्थिती

सध्या राज्यभरात जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. इंदापूर (पुणे) येथील महत्त्वाच्या सभा आणि दौरे आटोपून, केवळ सवसवाडीकरांच्या प्रेमापोटी आणि आग्रहास्तव आ. सुरेश आण्णा धस यांनी या धार्मिक सोहळ्यास हजेरी लावली. यावेळी बोलताना त्यांनी ओंकारेश्वर मंदिराच्या आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी सभामंडप व भरीव निधी देऊन सहकार्य करण्याचे जाहीर केले.

# लिटल फ्लावर इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



पाटोदा (प्रतिनिधी) : पाटोदा येथील पी.व्ही.पी. कॉलेजसमोर असलेल्या लिटल फ्लावर इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन व स्नेहमीलन कार्यक्रम अत्यंत उत्साही, शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कला, गुण, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवून गेला.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, गायन, समूहगान, भाषण अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करत आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, मंचावरील सादरीकरणातील शिस्त आणि सुसंस्कृत मांडणी पाहून उपस्थित पालक व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले की, "शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लिटल फ्लावर इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, संस्कार आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करत आहे."

कार्यक्रमाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक पठाण नजीर मोहम्मद सर, शाळेतील शिक्षकवर्ग, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय ॲडव्होकेट सय्यद आशरफ आणि सोमीनाथ कोल्हे यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शाळेतील शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांसाठी घेत असलेली मेहनत, पालकांचा सक्रिय सहभाग आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे स्नेहसंमेलन अधिकच रंगतदार ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या व्यवस्थापनाचे आणि शिक्षकांचे विशेष कौतुक केले.

# भारतातील रीटेल क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते - डॉ.दातार

बीड (प्रतिनिधी) : भारतीय अर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षांतच जगातील तिसरी मोठी अर्थसत्ता बनू शकेल. तशा संधीही आपल्याला चालून आल्या आहेत. ब्रिटन, न्यूझिलंड संयुक्त अरब अमिरात, युरोपीय महासंघ यांच्याशी झालेल्या व्यापारी करारांमुळे निर्यातवाढीत मोठी झेप अपेक्षित आहे. मात्र त्याचवेळी अनिवासी भारतीयांकडून भारतात गुंतवणुकीला प्रोत्साहनाबाबत, तसेच भारतातील रीटेल क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते, अशी अपेक्षा दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष व मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी बोलून दाखवली आहे.



केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत करताना ते म्हणाले, "भारतीय अर्थव्यवस्थेला प्रचंड ताकद देण्याचे सुप्त सामर्थ्य रीटेल क्षेत्रात आहे, परंतु भारतात एकतर या क्षेत्रात खूप कमी व्यावसायिक आहेत आणि जे आहेत ते उच्च करांच्या दडपणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सक्षमतेने स्पर्धा करु शकत नाहीत. त्यावर उपाय म्हणून सरकारने हे व्यावसायिक व सर्वसामान्यांवरील करांचे ओझे कमी करावे आणि अनिवासी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतातील रीटेल क्षेत्रात थेट गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन द्यावे. सरकारने अनिवासी भारतीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतीय रीटेल क्षेत्रात आकर्षित करून कर सवलती दिल्यास तसेच परकी थेट गुंतवणुकीस (एफडीआय) प्रोत्साहन दिल्यास येथे नव्या नोकऱ्या आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, कर्मचाऱ्यांना चांगले वेतनही मिळेल आणि व्यावसायिकांची संख्या वाढल्यास स्पर्धात्मकतेमुळे वस्तूंच्या किंमती कमी होऊन सर्वसामान्यांना वस्तू स्वस्तात मिळतील. अनेक अनिवासी भारतीय जगभरात उत्तम व्यवसाय करतात, पण भारतात गुंतवणुकीस राजी होत नाहीत.भारतातील रीटेल क्षेत्रात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि आगामी काळ भारतासाठी अत्यंत आश्वासक आहे, असे स्पष्ट करताना डॉ. दातार म्हणाले, की काही वर्षांपूर्वी भारत खरेदीदारांची बाजारपेठ होता तो आज विक्रेत्यांची बाजारपेठ बनला आहे.

## महाशिवरात्री व संताजी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त संगीत शिवमहापुराण कथा

पाटोदा दि ६ (प्रतिनिधी)- पाटोदा येथील ग्रामदैवत असलेल्या श्री भामेश्वर मंदिरात महाशिवरात्री महोत्सव व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दि. ८ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान संगीत शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री भामेश्वर मंदिर येथे गेल्या तीन दशकांपासून महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन केले जाते प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी अशा संयुक्त महोत्सवाचे निमित्त प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. भक्तीदिदी पांचाळ (आळंदी) यांच्या रसाळ वाणीतून संगीत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांना संगीतसाथ ह.भ. प. सुरेश महाराज पांचाळ ह. भ. प. प्रतिक महाराज विद्यालय पांचाळ ह. भ. प. संगीताताई सोळसकर ह.भ.प.राजू महाराज शिंदे व ह. भ. प. आनंद महाराज गाडे करणार आहेत. ह. भ. प. भक्तीदिदी पांचाळ यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ७ ते १० यावेळेत कथा होणार आहे. संगीत शिवमहापुराण कथा दि.८ ते १४ फेब्रुवारी पर्यंत होणार असून दि. १५ फेब्रुवारी रोजी रात्री शिव महाशिवरात्री निमित्त १० ते १२ ह. भ. प. राधाताई महाराज (संत मिराबाई संस्थान महासांगवी) यांचे कीर्तन होणार आहे. तर दि. १६ रोजी सकाळी ८ ते ११ शिवप्रतिमा व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शोभायात्रा निघणार आहे.

### कन्नुर विद्यापीठ केरळ येथील

## आंतरराष्ट्रीय काजवा परिसंवादात रणजित राऊत यांचा सक्रिय सहभाग



जामखेड (प्रतिनिधी) : केरळ राज्यातील कन्नूर विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभाग, ख्रिस्त कॉलेज इरिंजलकुडा व फायरफ्लाईस एशियन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "आंतरराष्ट्रीय काजवा परिसंवाद - काजव्यांचे वर्गीकरण, विविधता आणि जैव-पर्यावरणशास्त्र: काजव्यांच्या जगाला प्रकाशमान करणे" हा तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवाद ३ ते ५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान उत्साहात संपन्न झाला. या परिसंवादात भारतासह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बोलिव्हिया, व्हीएतनाम, मलेशिया आदी देशांतील तसेच भारतातील जम्मु काश्मीर, दिल्ली, तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओडिसा, आसाम, हिमाचल प्रदेश,पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, महाराष्ट्र या राज्यातील नामांकित शास्त्रज्ञ, प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक सहभागी झाले होते.

युवा शास्त्रज्ञ रणजित राऊत यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागाबद्दल महाराष्ट्रातील शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील जैवविविधता संशोधनाला नवी दिशा मिळत असल्याची भावना पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

## राष्ट्रसंत गाडगे महाराजांची १५० वी जयंती साजरी करण्यासाठी बैठक

बीड (प्रतिनिधी) : समाजप्रबोधन, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि सामाजिक समतेचा संदेश देणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीड शहरात भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सार्वजनिक जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष ॲड. सुधीर जाधव यांनी दिली आहे. ही बैठक रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ठीक १ वाजता,राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतिक सभागृह, मोंढा रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.


## जाहिर प्रगटन

कारणे जाहिर प्रगटन देतो की, जाहिर प्रगटन देणार मजकुरने सर्व्हे नं.९० शिवार लवुळ मधील ०९ एकर अनुक्रमे, दस्ताऐवज नं.१४६९/७१ दिनांक २८/०७/१९७१ रोजी ०४ एकर व ०५ एकर दस्ताऐवज नं.१७३१/७४ दिनांक १८/०६/१९७४ रोजी मुळ जमीन मालक १. मल्लिकार्जुन २. प्रभु ३. सदाशिव व ४. परमेश्वर सर्वांचा पिता नारायण स्वामी रा.लवुळ नं.१ यांचेकडुन रक्कम रुपये ९,००० व रक्कम रुपये ७,००० मध्ये कायम खरेदी केली असुन तेव्हापासुन मालक व काबीज जाहिर प्रगटन देणार हा आहे. सर्व्हे नं.९० शिवार लवुळ मध्ये उरलेली बाकी ३ एकर २९ गुंठे जमीन अरुन पिता सारंगधर शिंदे अ.पा.क. आई तारामती हिने अज्ञानाचे नावे दिनांक १८/०६/१९७४ रोजी दस्ताऐवज नं. १७३१/१९७४ अन्वये खरेदी केली आहे. अशा प्रकारे जाहिर प्रगटन देणार मजकुर हा एकुण ०९ एकर चा व अरुण पिता सारंगधर हा ०३ एकर २९ गुंठे मालक व काबीज आहे. परंतु अरुण हा सज्ञान झाल्यानंतर त्याने तलाठी मजकुर कडे पालनकर्ते आईचे नाव कमी करुन स्वतःचे नावे सज्ञानचा फेर घेण्यात यावा म्हणुन अर्ज केला. परंतु सदरील अर्जाप्रमाणे तलाठी याने फेर न घेता अरुण व तलाठी आणि मंडळ निरक्षक लवुळ यांनी आपसात संगणमत करुन जाहिर प्रगटन देणार मजकुरचे मुळ खरेदीखतांचे फेरफार मध्ये खाडाखोड करुन अरुण यांचे नावे खरदिखताप्रमाणे फक्त ०३ एकर २९ गुंठे चा फेर घेण्याऐवजी ०६ एकर २९ गुंठे चा फेर घेवुन त्या प्रमाणे ७/१२ पत्रकात खोटे क्षेत्रफळ दाखवुन फेर कायद्याविरुध्द मंजुर केला. ज्याच्या नाराजीने जाहिर प्रगटन देणार मजकुरने अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांच्याकडे कार्यवाही केली असुन ते प्रलंबित आहे.

अरुण सारंगधर शिंदे याने त्याचे नावे सज्ञान फेर घेत असतांना व ७/१२ वर चुकीचे क्षेत्रफळ नोंदणी केले असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेण्याचे उदेशाने रामराव शिंदे यांचे खरेदीखता मधुन ०३ एकर जमीन कमी करुन स्वतःचे नावे ०६ एकर २९ गुंठे जमीन ७/१२ ला असल्यामुळे त्यापैकी ०३ एकर जमीन त्याची पत्नी नंदिनी मजकुर चे नावे खोटा फेर घेतला इतकेच नव्हे तर तो सदरील जमीन या खोट्या फेरचा गैरफायदा घेण्याचे उदेशाने व जाहिर प्रगटन देणार मजकुर ला त्रास देण्याच्या उद्देशाने जमीन विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. अशा प्रकारे अरुण किंवा त्याची पत्नी नंदिनी यांच्याशी कोणीही खरेदी विक्री गहाण तारण किंवा कुठल्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो जाहिर प्रगटन देणार मजकुरवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशा व्यवहार करणारयावर कायदेशीर दिवाणी व फौजदारी प्रकारचे कारवाई करण्यात येईल.कळावे...

दिनांक : ०७/०२/२०२६

जाहिर प्रगटन देणार : **रामराव साहेबराव शिंदे**
रा.लवुळ नं.१ ता. माजलगाव जि. बीड. मो.नं.९३७१०६६६५६

## जाहिर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार : नारायण पि.बाबुराव सातपुते**, रा. संभाजी चौक माजलगाव ता. माजलगाव जि.बीड

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, शिवार मौजे मोगरा ता. माजलगाव जि.बीड हद्दीतील गट नं. १९८ मधील एकुण जमीन ०० हे.४०.५० आर जमीन जिची चतुसिमा खलील प्रमाणे,

पुर्वेस : किसन बाळाजी सातपुते यांची जमीन, पश्चिमस : दुर्गादास प्रभाकर जोशी, दक्षिणेस : दिलीप कालीदास शिंदे, उत्तरेस : रस्ता

वरील वर्णनाच्या व चतुः सिमेच्या आतील मिळकत मी उपरोक्त श्री. रेणुकादास पि. प्रभाकर जोशी या व्यक्तीकडून त्यांचे कुटुंबाला पैश्याची गरज निर्माण झाल्यामुळे त्यांनी विक्रीला काढली होती त्यामुळे त्यांचा आणि माझा वरील जमीन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव दिनांक ०४/०२/२०२६ रोजी साक्षीदारासमक्ष झालेला असुन ईसारापोटी मी १,६५,०००/- दिनांक ०४/०२/२०२६ रोजी त्यांना धनादेशाव्दारे दिलेले असुन जमीन विक्रेते रेणुकादास पि. प्रभाकर जोशी यांनी माझ्या हक्कात साक्षीदारासमक्ष लेखी ईसारपावती करुन दिलेली असुन बाकी रक्कम खरेदीखतावेळी देण्याचे ठरलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे आश्वासन व विश्वास व खात्री उपरोक्त मालकाने दिलेली आहे. या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्ती, संस्था, शासकीय/निमशासकीय कार्यालय अथवा बँक, खाजगी कर्ज इ.चे काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध तसेच इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र, आम मुख्त्यारपत्र, चोळी, बांगडी, इ. स्वरुपाचे हक्क संबंध असतील तर संबधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. नमुद मुदतीत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आला नाही तर कोणाचाही कसलाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदर मिळकतीचे कायमचे खरेदीखत आमचे अशील त्यांच्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अथवा उजर ग्रहीत धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक : ०६/०२/२०२६
ठिकाण : माजलगाव

मार्फत
**ॲड.एस.आर.आचार्य**
कार्यालय : छत्रपती नगर माजलगाव
ता. माजलगाव जि. बीड. मो.नं. ९३२५५६२६७२

जाहीरप्रगटन देणार
**नारायण पि.बाबुराव सातपुते**
रा.संभाजी चौक माजलगाव
ता. माजलगाव जि.बीड
मो.नं.९४२२०५९९३१

दै.पार्श्वभूमी,बीड — Date- 07/02/2026

**DECLARATION**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**OLD NAME - SAYYAD TAYABUN KHAJA**
**New Name - SAYYAD TAYBUN KHAJA**
ADDRESS-W/O KHAJA SAYYAD RAJ GALLI MAJALGAON DIST.BEED MS 431131

**टी.सी.हरवला आहे**

**गणेश राधाकृष्ण सोळंके**
या नावाचा इयत्ता बारावी उत्तीर्ण टीसी तेलगाव बस स्थानकावर हरवला आहे. कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
- संपर्क -
९६०४०४०८८३

# पार्श्वभूमी

दि.०७ फेब्रुवारी २०२६ शनिवार



## ज्येष्ठ नागरीक,पेन्शनर्स मधुमेही रुग्णांसाठी मोफत नेत्रपटल तपासणी शिबीराचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):- ज्येष्ठ नागरीक व पेन्शनर्ससाठी बीड येथे आनंदऋषीजी डायग्नोस्टीक सेंटर बीड येथे (राजर्षी शाहू बँकेजवळ, जालना रोड, बीड) येथे आयोजित मधुमेही रुग्णांसाठी विशेष नेत्रपटल (रेटीना) तपासणी शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन सिनीयर सिटीझन ॲण्ड पेन्शनर्स असोशिएशनचे बीड जिल्हाध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे. जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर यांच्या वतीने बीड येथे मधुमेही रुग्णांसाठी मोफत विशेष नेत्रपटल (रेटीना) तपासणी शिबीर रविवार दि.८ फेब्रुवारी

पान २ वर

## कागदी घोडे नाचवू नका; थेट पोलीस ठाण्यात तक्रार द्या

# चकलंबा शासकीय दवाखान्यावर जेसीबी चालली; पण अद्याप गुन्हा नोंद का नाही?

बीड दि ६ (प्रतिनिधी) - चकलांबा येथील साठ वर्षांपूर्वीची शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्राची ऐतिहासिक इमारत काही भूमाफियांनी जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. मुख्य रस्त्यालगत असलेली ही इमारत दिवसाढवळ्या पाडण्यात आली, मात्र या प्रकाराबाबत अद्याप एकाही व्यक्तीवर गुन्हा नोंद झालेला नाही. त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या भूमिकेवर तीव्र संशय व्यक्त केला जात आहे.

सदर इमारत जिल्हा परिषद बांधकाम विभागाने उभारली असली, तरी ती आरोग्य विभागाच्या ताब्यात देण्यात आलेली होती. असे असतानाही इमारत पाडल्याप्रकरणी थेट चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार देण्याऐवजी आरोग्य विभागाकडून बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती



आहे. आरोग्य विभागाची इमारत पाडली असताना कारवाईसाठी बांधकाम विभागाकडे धाव का घेतली जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

चकलांबा परिसरातील गाव, वस्ती व तंड्यांसाठी हे प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यंत महत्त्वाचे होते. ही जागा गावकऱ्यांनी आरोग्य सेवेसाठी दान दिलेली असून या परिसरात कर्मचाऱ्यांची निवासस्थाने तसेच पूर्वी जनावरांचा दवाखानाही होता. जनावरांचा दवाखाना अन्य ठिकाणी स्थलांतरित झाल्यानंतर त्या जागेवर भूमाफियांनी कब्जा करून व्यावसायिक गाळे उभारल्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत. आता त्याच पद्धतीने प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा हडपण्याचा डाव आखण्यात आल्याची जोरदार चर्चा आहे.महत्त्वाचे म्हणजे कोणतीही शासकीय इमारत पाडण्यासाठी संबंधित विभागाची लेखी परवानगी आवश्यक असते. मात्र या इमारतीसाठी जिल्हा आरोग्य विभागाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

पान २ वर

ना.पंकजाताईंचे माध्यमातुन होणारा

## महापशुधन एक्स्पो मेळावा बीडच्या शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी–शंकर देशमुख

पाटोदा०६(प्रतिनिधी) पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि.१३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे

बीड जिल्ह्यातील परळी येथे दि.१३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन



आयोजित करण्यात आले आहे.ना.पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १५०० विविध

पान २ वर

## तलाव भरलेला तरीही पाटोदकरांना नळाचे पाणी पंधरा दिवसाला एकदा

पाटोदा दि ६ (प्रतिनिधी) - पाटोदा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महासागवी या प्रकल्पात प्मोठ्या प्रमाणात पाणी साठा असूनही पाटोदा शहरवासीयांना नगरपंचायत द्वारा पंधरा दिवसाला एकदा नळाद्वारे पाणी सोडले जात आहे नगरपंचायतच्या या कारभाराला नागरिक कंटाळले असून नगरपंचायत ने नळाचे पाणी चार-पाच दिवसात एकदा पुरवावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या नीलाताई पोकळे यांनी केली असून नगरपंचायतने पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास नगरपंचायत समोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. पाटोदा नगरपंचायत द्वारा पाणीपुरवठा संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या नीलाताई पोकळे मॅडम यांनी पुढे सांगितले की नगरपंचायतच्या बेजबाबदार कारभारामुळे पाटोदा शहरवासीयांना तब्बल पंधरा दिवसांला नळाद्वारे पाणी मिळते विशेष म्हणजे पाटोदा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावात पाणीसाठा मुबलक असूनही पाटोदा नगरपंचायच्या बेजबाबदार गलथान कारभारामुळे शहराला पंधरा दिवसांला एकदाच पाणीपुरवठा केला जातो आहे नगरपंचायत द्वारा नागरिकांची उघडपणे आडवणूक

पान २ वर

## बापूसाहेब लगड यांना मातृशोक

गेवराई दि.६ (प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील मौजे केकतपांगरी येथील मुळ रहिवासी व सध्या बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीत पुणे येथे



कार्यरत असलेले बापूसाहेब अच्युतराव लगड यांच्या मातोश्री गं.भा.सुशिलाबाई अच्युतराव लगड पाटील यांचे गुरूवार दि.५ फेब्रुवारी रोजी रात्री नऊ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी दहा वाजता स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९५ वर्षे इतके होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांना भाऊसाहेब, रावसाहेब व बापूसाहेब अशी तीन मुले असून रावसाहेब लगड या मुलाचे कोरोणा काळात

पान २ वर

## सहयोग नगरच्या संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त कार्यक्रम

बीड दि ६ (प्रतिनिधी)- शहरातील सहयोग नगर भागामध्ये असलेल्या संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त सोमवार दि. २ फेब्रुवारीपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्यामुळे दररोज भक्तिमय वातावरणात बहारदार कार्यक्रम पार पडत असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निमित्ताने गजानन महाराज पारायण सोहळा, भजन-कीर्तन, नामस्मरण, हळदीकुंकू कार्यक्रम, तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या वतीने अन्नदान सेवा राबविण्यात येत असून मोठ्या संख्येने भाविक प्रसादाचा लाभ घेत आहेत.गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी केशव शंखनाद पथक, पुणे यांच्या वतीने शंखनाद व विशेष सेवा सादर करण्यात आली. या कार्यक्रमाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी प्रगट दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी महारुद्र अभिषेक, महापूजा तसेच भाविकांसाठी महापंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या सहकार्य व देणगीतून मंदिराचा मोठ्या प्रमाणात जीर्णोद्धार करण्यात आला

पान २ वर

## कारखान्याच्या काजळी व विषारी पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर धोका

### स्मरणपत्राद्वारे कार्यवाहीची मागणी–सचिन शेजुळ

माजलगांव (प्रतिनिधी):-माजलगांव तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश शुगर इंडस्ट्रीज (एन.एस.एल.) या साखर कारखान्यामुळे परिसरात गंभीर प्रदूषण निर्माण होत असून मानव व पशुधनाच्या जीविताला धोका निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी ६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे स्मरणपत्र देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.



खरात आडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन आन्नासाहेब शेजुळ यांनी दिलेल्या निवेदनानुसार, संबंधित कारखान्याच्या धुराड्यातून मोठ्या प्रमाणात काळी काजळी, धूळ व बारीक भुस्सा हवेत पसरत असून हे प्रदूषित कण तब्बल २० किलोमीटरपर्यंत परिसरात पसरत आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील दृश्यमानता कमी होत असून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच कारखान्यातील मळीचे घाण व विषारी पाणी परिसरातील रस्त्यांलगत असलेल्या नाल्या, ओढे, कॅनॉल व खदानींमध्ये सोडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या दूषित पाण्याचा परिणाम विहिरी व बोअरवेलवर होत असून नागरिकांमध्ये डोळे, श्वसन व हृदयविकार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढल्याचे सांगण्यात आले आहे. अनेक ठिकाणी पशुधन व पक्ष्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात

पान २ वर

जड अंत:करणाने अजितदादांच्या अस्थिंचे मंजरथ येथे विसर्जन

## वेगाला हरवणारा माणूस वेगाशीच एकरूप झाला–आ.प्रकाश सोळंके

माजलगाव दि.६(प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार आपल्यात नाहीत ही कल्पनेपलीकडची दुर्दैवी गोष्ट स्विकारण्यासाठी मन धजावत नव्हते पण नियतीने क्रुर थट्टा करत आपल्यावर ही कठीण वेळ आणली. दादांचा वेग, त्यांची उर्जा आणि त्याचे कार्य सदैव स्मरणात राहील. त्यांच्या आठवणी कामय मार्गदर्शक ठरतील असे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले. दि. ६ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र मंजरथ दक्षिण काशी येथील गोदावरी नदीपात्रात स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे विसर्जन जयसिंग सोळंके यांनी केले.





यावेळी बोलताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रकाश सोळंके म्हणाले की, अपर कुंडलीका प्रकल्प अजित दादांमुळेच मार्गी लागला. त्यांनी ठाम भूमिका घेत सरकारची ताकद वापरून हजारो एकर क्षेत्राला पाणी मिळवून दिले. जलसंपदा मंत्री असताना पैठण ते नांदेड दरम्यान अनेक बॅरेजेस उभारण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि विकासाभिमुख धोरणांमुळे मराठवाड्यातील शेतीला मोठा दिलासा मिळाला, असेही त्यांनी नमूद केले.प्रत्येक कामावर बारीक लक्ष ठेवणारा, अडचणीत धावून येणारा असा नेता आता राहिला नाही. माजलगावचे त्यांनी जणू पालकत्वच घेतले होते. शहराच्या आणि तालुक्याच्या प्रत्येक विकासकामात त्यांची मदत होती. त्यांच्या निधनामुळे सर्वसामान्यांसाठी तळमळीने काम करणारा नेता हरपल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले होते. अनेकांनी अस्थिकलशाचे दर्शन घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. बीड जिल्ह्याची बारामती करण्याचे स्वप्न सुनेत्रा वहिनी पूर्ण करतील असा विश्वासही प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला.

पान २ वर

## लिंबारुई येथे सोमवार पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

नवगण राजुरी दि.६ (प्रतिनिधी):- येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान लिंबारुई येथे शिवस्वरूप संत श्री नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशीर्वादाने शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ९ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत शिवकथा, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन होणार असून या सप्ताहाचा आरंभ श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते विना पूजनाने होईल. या सप्ताहात ह.भ.प. धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज, ह.भ.प. विशाल महाराज करांडे, ह.भ.प. महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री, ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री, ह.भ.प. अशोक महाराज, ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर, ह.भ.प. केशव महाराज भगत यांचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज धायगुडे यांचे सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होणार असून या सप्ताहाच्या सात दिवसात रुद्र स्वाहाकार महायज्ञ सकाळी ८ ते ११ या वेळेत होणार असून पुरोहित मिथुन देवा निर्मळ हे असणार आहेत. रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कलश रोहनचा कार्यक्रम होणार आहे. तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी लिंबारुई यांनी केले आहे.

## उच्चशिक्षित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



शिरूर कासार दि.६(प्रतिनिधी):-उच्चशिक्षित तरुणाने जनावरांच्या गोठ्यासमोरील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.६) राक्षसभुवन-तांबा (ता. शिरुर कासार )येथे घडली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही, शिरुर पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राक्षसभुवन (तांबा) येथील अनंता प्रभाकर खोले वय ३७ वर्षे या उच्चशिक्षित तरुणाने पैठण- पंढरपूर मार्गालगतच्या शेतातील जनावरांच्या गोठ्यासमरील लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीने पहाटे गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. दिपक खोले यांच्या माहितीवरून शिरुर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन शिरुरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले. शिरुर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## भटक्या कुत्र्यांचा उपद्रव न रोखल्यास २०फेब्रुवारीला न.प.आंदोलन- शिवसेना

बीड दि ६ (प्रतिनिधी)- बीड शहरात वाढलेल्या



भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख कामरान खान (एकनाथ शिंदे गट) यांनी केली आहे. अन्यथा दि. २० फेब्रुवारी २०२६ पासून बीड नगरपालिकेच्या दारात आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा दिला आहे.

राज्यात भटक्या कुत्र्यांकडून चावा घेण्याच्या घटनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, अशा कुत्र्यांची नसबंदी करणे व रेबीज विरोधी लस देणे याबाबत केंद्र सरकारच्या स्पष्ट मार्गदर्शक सूचना आहेत. या सूचनांच्या चौकटीत राहून कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात विशेष मोहीम राबविण्याचा सकारात्मक निर्णय घेतला जाईल तसेच यासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी दि. १२ जुलै २०२५ रोजी जाहीर केले होते. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भटक्या श्वानांची नसबंदी केल्यानंतर त्यांना ज्या ठिकाणाहून पकडण्यात आले, त्याच ठिकाणी पुन्हा सोडणे बंधनकारक आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या स्तरावर निविदा काढून उपाययोजना करतात. मात्र बीड शहरासह परिसरात

पान २ वर

## मनरेगातील कंत्राटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या आंदोलनाला बदामराव पंडितांचा पाठिंबा

### मुख्यमंत्री फडणवीस,ना.मुंडे, ना.गोगावलेंना निवेदन



गेवराई दि.६(प्रतिनिधी):- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी ( एम आर इ जी एस ) योजनेअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांनी मुंबईत आझाद मैदानावर सुरू केलेल्या आंदोलनास भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जाहीर पाठिंबा दिला असून त्यांच्या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री मंत्री पंकजाताई मुंडे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना निवेदन देऊन, याबाबत योग्य निर्णय घ्यावा अशी विनंती आपण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी आंदोलकांना दिले आहे.मनरेगा योजनेअंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी व अधिकारी हे मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत या आंदोलनाला भाजपने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी पाठिंबा दिला आहे. या आंदोलकांच्या मागण्याबाबत माजी मंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण व महिला बालकल्याण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांना निवेदन दिले आहे या निवेदनात बदामराव पंडित यांनी म्हटले आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण व दुर्बळ घटकांचा सर्वांगीण विकास साधण्याचे आणि प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गेल्या १४ वर्षांपासून कंत्राटी अधिकारी व कर्मचारी प्रभावीपणे करत आहेत. मनरेगा योजना महाराष्ट्र राज्यात तसेच राष्ट्रीय स्तरावरही अग्रस्थानी

पान २ वर